*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

# UNIT 4
# LUDWIG WITTGENSTEIN
# विट्गेनस्टाईन

1 अर्थाचा चित्रसिद्धान्त

2 अर्थाचा उपयोग सिद्धान्त

3 जीवनाचे आकार



**Ludwig Joseph Johann Wittgenstein**
(26 April 1889 – 29 April 1951), an Austrian-British philosopher, worked primarily in logic, the philosophy of mathematics, the philosophy of mind, and the philosophy of language; professor in philosophy at the University of Cambridge from 1939 until 1947. In his lifetime, he published just one book review, one article, a children's dictionary, and the 75-page *Tractatus Logico-Philosophicus* (1921) In 1999, his posthumously published *Philosophical Investigations* (1953) was ranked as the most important book of 20th-century philosophy.

**प्रस्तावना** : लुडविग जोसेफ योहान विट्गेनस्टाईन हे विसाव्या शतकातील एक वैचारिक आश्चर्य आहे. त्याचा जन्म युरोपमधील ऑस्ट्रिया या देशातील व्हिएन्ना शहरात एका धनाढ्य कुटुंबात झाला. त्याचे पूर्वज ज्यू होते. पण त्याच्या आजोबांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता.त्याचे वडिल पोलाद उद्योजक होते तर आई अतिशय सात्त्विक प्रवृत्तीची गृहिणी होती. शिवाय ती संगीतप्रेमी होती. विट्गेनस्टाईन्स हे सुसंस्कृत कुटुंब होते.



## पार्श्वभूमि

विसावे शतक हे पाश्चात्य तत्त्वज्ञानासाठी मोठे क्रान्तिकारक ठरले. तत्त्वज्ञान या विषयाचे स्वरुप आणि कार्य यासंबंधात नवनव्या कल्पना केंब्रिज विद्यापीठात उदयास आल्या आणि तेथून त्या इतरत्र पसरल्या. विसाव्या शतकापर्यंत तत्त्वज्ञान पारंपरिक सत्ताशास्त्राभोवती म्हणजे ईश्वर व त्याचे स्वरूप, सनातन पाप, पामुक्तिचे मार्ग, आत्मा, पुनर्जन्म, इत्यादी समस्यांभोवतीच घोटाळत होते. ते विसाव्या शतकात बदलले. नवी मते मांडली गेली आणि पारंपरिक सत्ताशास्त्रचा उच्छेदच झाला. प्रचंड क्रांती झाली. प्रत्येक संकल्पनेचे, जगाचे, अनुभावाचे विश्लेषण सुरु झाले.

या मतांप्रमाणे तत्वज्ञानाचा विषय वास्तवतेचे वर्णन करणे किंवा आत्मा-परमात्मा यांच्या ज्ञानाची चिकित्सा करणे, हे नसून *भाषेची चिकित्सा* करणे, हे आहे, असे मांडले गेले. शब्दांचा अर्थ तपासणे हेच तत्त्वज्ञानाच्या दृष्टिने महत्वाचे असते. कारण, वास्तवतेचे वर्णन किंवा ज्ञानमीमांसा आपणास शब्दांच्याच मदतीने करावे लागते. म्हणून तत्त्ववेत्याने भाषेवर लक्ष केंद्रित करावे, भाषेची चिकित्सा करावी ,असा एक नवा विचारप्रवाह इंग्लडमध्ये उदयास आला. नव्या पिढीतल्या विचारवंतांनी त्याचे उत्साहाने स्वागत केले. या सिद्धान्ताचा परिणाम विज्ञान व तत्त्वज्ञान या दोन्ही क्षेत्रांवर घडून आला. त्यातूनच विश्लेषणवाद जन्मला. या नव्या विचारप्रवाहाच्या उदयास आणि अभिवृद्धीस ज्या तत्ववेच्यांनी हातभार लावला त्यात विटगेनस्टाइनची गणना प्रामुख्याने करावी लागते.

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



विसाव्या शतकात तत्त्वज्ञान व विज्ञान या ज्ञानक्षेत्रांमध्ये झालेल्या या विलक्षण क्रान्तीमागे एक मुख्य कारण विटगेनस्टाईनचे तत्त्वज्ञान हे होते.मुळात विज्ञानाने जी पध्दती अवलंबिली होती, तिच्यावर विश्लेषणवादी परंपरेचा मोठा प्रभाव होता. विश्लेषणाने जीवनाच्या व ज्ञानाच्या सर्व अंगावर प्रभाव गाजविला होता. त्याचे **तार्किक अनुभववाद व भाषिक विश्लेषणवाद** हे दोन मुख्य पंथ होते. मूर, रसेल हे तार्किक अनुभववादी होते तर भाषाविश्लेषणात विट्गेनस्टाईन, ऑस्टिन यांचा मुख्य सहभाग होता. त्यात जे.ई. मूर हा तत्त्ववेत्ताही काही अंशी सहभागी होता. ''तात्विक समस्यांची उकल करण्यासाठी व्यवहारातील भाषेचेच सरळ विश्लेषण करावे'', हा विश्लेषणवाद्यांचा मध्यवर्ती सिद्धान्त होता. विट्गेनस्टाईनमुळे हा सिद्धान्त जास्त सकस झाला. एकूणच विटगेनस्टाईनमुळे विसाव्या शतकातील वैचारिक चिंतनाला अतिशय उच्च दर्जा लाभला. स्वत:चे तत्त्वज्ञान मांडल्यानंतर विटगेनस्टाईन प्रख्यात अशा *व्हिएन्ना सर्कल* शी जोडला गेला. या गटात कार्नाप , न्युरॉथ , एअर , हेम्पेल, पॉपर ही मंडळी सुद्धा होती. हा गट **'सामान्य भाषा विश्लेषणवादी गट'** म्हणून ओळखला जातो. त्यामुळे विटगेनस्टाईनला सुध्दा **'सामान्यभाषा विश्लेषक'** असे म्हणतात. विटगेनस्टाईनने मांडलेल्या भाषासिद्धान्ताचे स्वरुप पुढीलप्रमाणे:

## विट्गेनस्टाईनचे ग्रंथ लेखन

विटगेनस्टाईनने आपले तत्वज्ञान मुख्यत: *ट्रॅक्टेटस लाजिको फिलॉसाफिकस्* (तत्त्वज्ञानविषयक तर्कशास्त्रीय ग्रंथ ***Tractatus Logico-Philosophicus*** - TLP) आणि *फिलॉसॉफिकल इन्व्हेस्टीगेशन्स '*(तात्त्विक संशोधने ***Philosophical Investigations*** -PI) या ग्रंथातून मांडले. दुसऱ्या ग्रंथात त्याने पहिल्या ग्रंथातील मते खोडुन काढली . ती इतकी भिन्न आहेत की ती परस्परविरोधीच आहेत. त्यामुळे दोन भूमिका तयार होतात. म्हणुन त्याच्या पहिल्या ग्रंथातील भूमिकेस **'आधीचा विटगेन्स्टाईन** (earlier Wittgenstein अर्लीअर विटगेनस्टाईन.) व दुसऱ्या ग्रंथातील भूमिकेस **'नंतरचा विटगेनस्टाईन'** (later Wittgenstein लेटर विटगेनस्टाईन) असे म्हणतात.

विटगेनस्टाईनचा भाषेविषयीचा चित्रसिद्धान्त पहिल्या पुस्तकात - TLP तर भाषाविषयक खेळ सिद्धान्त दुसऱ्या पुस्तकात - PI आणि जीवनाचा आकार हा मुद्दा दुसऱ्या पुस्तकात व त्याच्या अन्य लेखनात मांडला आहे. त्याच्या या भूमिका समजावून घेण्यासाठी आधी आपण त्याची तत्त्वज्ञानविषयक मते पाहून:

## विटगेन्स्टाईनची तत्त्वज्ञानविषयक मते

विटगेन्स्टाईनच्या मते तत्त्वज्ञान ही एक *कृती* (Activity) किंवा उपक्रम आहे. म्हणजेच चिंतन करणे हा कृतीचाच एक प्रकार आहे. चिंतनातून कोणतेतरी निश्चित ज्ञान प्राप्त होतच असते.एखादा खेळ शिकल्यानंतर आपण काय शिकलो हे जसे आपणास सांगता येत नाही पण काय शिकलो, ते प्रत्यक्ष खेळून दाखविता येते; तसे तत्त्वज्ञान शिकलो ,म्हणजे नेमके काय शिकलो हे सांगता येत नाही पण तत्त्वज्ञान जगून दाखविता येत. चिंतन अथवा तत्त्वचिंतन कसे करावे, तत्त्वज्ञान शिकल्यानंतर तत्त्वज्ञानाच्या पध्दतीने विचार कसा करावा किंवा केला जातो, हे आपण दाखवू शकतो. कसे ? तर प्रत्यक्षात तशी मांडणी करुन. ही मांडणी करणे म्हणजे कृती करणे, याचाच अर्थ चिंतन करणे, विचार करणे.म्हणूनच तत्त्वज्ञान म्हणजे कृती असते, असे विटगेन्स्टाईन म्हणतो.

ही कृती कशी घडते ? कोण करते ? तर तत्त्वज्ञान शिकणाऱ्या विद्यार्थ्यांने कोणत्याही प्रश्नाचे सामान्यीकरण न करता तो प्रश्न सुटा करुन त्याचे विश्लेषण करावे. त्या प्रश्नाचा अर्थ समजावून घ्यावा आणि निरर्थक असलेले प्रश्न वितळवून टाकावेत !केवळ अर्थपूर्ण प्रश्नच चिंतनासाठी घ्यावेत. हे कार्य अगदी वैशिष्यपूर्ण आहे. कोणती विधाने कशी अर्थपूर्ण बनतात व कशी अर्थहीन बनतात, हे शोधणे हेच ते वैशिष्य होय. या शोधासाठी तर्कशास्त्राची मदत घ्यावी, कारण तर्कशास्त्र आपणास अर्थपूर्ण रितीने काय म्हणता येते आणि काय म्हणता येत नाही, ते शिकविते. कारण तर्कशास्त्राचा संबंध भाषेशी असतो. भाषा हाच खरा तर तर्कशास्त्राचा विषय आहे , भाषा ही कृती आहे, असे विटगेन्स्टाईनला वाटते.हा त्याचा भाषाविषयक दृष्टिकोन त्याने *'ट्रॅक्टेटस' व 'इन्व्हेस्टीगेशन्स'* मध्ये मांडला.

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

## तत्वज्ञान आणि विज्ञान

विटगेनस्टाइनने कल्पिलेली तत्त्वज्ञानाची प्रधान समस्या कोणती ते कळण्यासाठी त्यांनी तत्वज्ञान आणि विज्ञान या दोहोंमध्ये जो महत्वाचा भेद केलेला होता तो ध्यानात घेतला पाहिजे. तत्वज्ञान आणि विज्ञान या दोहोंची उदिष्टे, कार्यक्षेत्रे आणि कार्यपद्वती सर्वस्वी भिन्न आहेत. असे त्याचे ठाम मत होते. तो म्हणतो''तत्त्वज्ञान हे विज्ञानशास्त्रापैकी एक शास्त्र नव्हे. ते निसर्गशास्त्रांच्या पंक्तीत बसत नाही. त्याचे स्थान विज्ञानापेक्षा वरच्या पातळीवर असेल किंवा खालच्या पातळीवर असेल, परंतु ते विज्ञानाच्या बरोबरीने नाही हे खास ''(ट्रॅ. 4.111)



विटगेनस्टाइनला विज्ञानाची महती मान्य होती. तो स्वत:च एक वैज्ञानिक संशोधक होता. आधुनिक विमानविद्या आणि अभियांत्रिकीत त्याने प्रावीण्य मिळविले होते. तरीही तो विज्ञानाकडून तत्वज्ञानाकडे वळला होता. कारण, विज्ञानाच्या अध्यापनाने जीवनाचे गहनतर प्रश्न सुटत नाहीत, विश्वाचे अंतिम रहस्य जाणून घेण्याची मानवी मनाची तळमळ विज्ञानो शांत होत नाही, असे त्यांस आढळून आले हाते. ईश्वर, आत्मा, मूल्ये, जीवनाची दाहक अनुभूती याविषयीच्या अंतिम प्रश्नांची उत्तरे विज्ञान देवू शकत नाही, याचा जणू साक्षात्कार त्यास झाला होता. तो म्हणतो ''विज्ञानातील सगळे प्रश्न जरी सुटले तरीही जीवनाच्या समस्या अनुत्तरित राहतात. विज्ञानाचे सिद्धान्त त्या समस्यांना स्पर्शच करु शकत नाहीत.''( ट्रॅ. 6.52)

त्याच्या मते तत्वज्ञान आणि विज्ञान या दोहोत मूलगामी फरक आहे. त्यांचे अभ्यासविषय वेगळे आहेत. तत्वज्ञानात अतिंम तत्वांचे चिंतन करावयाचे असते. तर विज्ञानात इंद्रियदत्त वास्तवतेचे वर्णन करावयाचे असते. वस्तुस्थितीचे निरीक्षण करुन सृष्टीचे नियम शोधून काढणे अणि वैज्ञानिक सिद्वांताची शहानिशा करणे हे विज्ञानाचे कार्य आहे. ते तत्वज्ञानाचे कार्य नव्हे. विज्ञानातील विधाने निरीक्षणप्रयोगादी विगमनात्मक पद्वतीनी सिद्ध करता येतात. परंतु तत्वज्ञानातील विधाने तशा पद्धीतीनी सिद्ध करता येत नाहीत. वैज्ञानिक विचारसरणी ही अनुभवोत्तर स्वरुपाची असते. पण आध्यात्मिक तत्वचिंतन हे अनुभवपूर्व स्वरुपाचे असते. ते विगमनात्मक सामान्यीकरणे रचीत बसत नाही. ते अनुभवदत्त गोष्टीविषयी अभ्युपगम रचून,त्यांच्यापासून निगमनात्मक निष्कर्ष काढत नाही.

अशा रितीने, तत्त्वचिंतन हे विगमनात्मकही नसते आणि निगमनात्मकही नसते. तर ते चिकित्सक आणि अर्थविवरणात्मक असते. तत्त्वचिंतनाच्या हिशेबी सगळी विधाने एकाच पातळीवर असतात. तत्वज्ञानाचे क्षेत्र समस्तरीय असते. विटगेनस्टाइनच्या मते, रसेल जे विधानांचे प्रकार करतो, ते स्वीकारण्याची गरज नाही.

सारांश, विटगेनस्टाइनच्या मते, तत्त्ववेत्त्याने वैज्ञानिक विचारसरणीचा अवलंब करण्याची आवश्यकता नाही. कारण तत्त्वज्ञान ज्यांचा विचार करते त्या अंतिम तत्त्वांविषयीचे चिंतन हा एक स्वतंत्र, अनन्यसाधारण बौदि्धक प्रयास आहे. अर्थात, तत्त्वज्ञान हे विज्ञानाशी स्पर्धा करीत नाही. ते विज्ञानाच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करीत नाही. ते वैज्ञानिक उपपत्तीचे परीक्षण करीत नाही, ते सृष्टीविषयक ज्ञानात भर टाकीत नाही, ते वस्तुस्थितिविषयक विधाने रचीत नाही. पण तत्वज्ञान हे शहाणपण शिकविते. ते शब्दांचा, वक्तव्यांचा, विधानांचा अर्थ सुस्पष्ट करते. ते तथाकथित विद्वानांचे वैचारिक प्रमाद अचूक रीतीने दाखवून देते; मग ते विद्वान, तत्ववेत्ते असोत, वा वैज्ञानिक असोत. जर कोणी वास्तवतेविषयी अवैज्ञानिक वक्तव्ये केली तर त्या वक्तव्यांचा फोलपणा तत्त्वज्ञान उघडकीस आणते. आणि एका अर्थाने अप्रत्यक्ष रीतीने ते विज्ञानाला बळकटी आणते. पण त्याचवेळी वैज्ञानिकाने जर आपली पायरी सोडून बेताल वक्तव्ये केली तत्त्वज्ञान त्यांचा यथास्थित समाचार घेते. अशा प्रकारे ते विज्ञानाला त्याची मर्यादा दाखवून देते.

## वक्तव्य आणि न-वक्तव्य

अशा प्रकारे, आधुनिक तर्कशास्त्राच्या मदतीने, विधानांची मीमांसा केली की, विज्ञान, तर्कशास्त्र, भाषा किंवा, थोडक्यात म्हणजे शब्दांकित होणारे मानवी विचार आणि ज्ञान, हे सारे कसे मर्यादित आहे ते कळून येते. या विधानमीमांसेत आपणांस, विशुद्व तार्किक दृष्टिकोनातून आपल्या साऱ्या वक्तव्यांचे परिक्षण करता येते. आणि त्यातील अर्थपूर्ण वक्तव्यांची अर्थपूर्णता नेमकी कशात आहे हे जाणून घेता येते. म्हणजेच, अशा अर्थपूर्ण वक्तव्यांत कोणत्या गोष्टी प्रविष्ट होतात ते समजून येते. अशा रीतीने या वक्तव्यांच्या सीमारेषेप्रत आपण येऊन धडकतो आणि कितीही

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



प्रयत्न केला तरी त्या सीमारेषा आपणास उलंघिता येत नाहीत. जरा संकुचित दृष्टीचा त्याग करुन, डोळ्यावरील सारी आवरणे दूर सारुन, मुक्त नजरेने विश्वाच्या पसाऱ्याकडे पाहिले की त्या सीमारेषेंच्या पलीकडील गोष्टींची आपणास जाणीव होते. पण ही जाणीव सदैव शब्दातीत रहाते.

विटगेनस्टाइनच्या मते ही जाणीवच तत्त्वज्ञानात व्यक्त होते. या शब्दां ''पलीकडच्या'' गोष्टीचां (अध्यात्मिक तत्वांचा) वेध घेण्याची आपली धडपड असते. ऋषीमुनीच्यां पवित्र आचरणात, भगवद्भक्तांच्या भक्तीच्या उमाळ्यात, कलावंतांच्या अभिजात सौंदर्यसाधनेत, कवीच्या उत्स्फूर्त उद्गारांत, संवदेनशील व्यक्तीना जाणवणाऱ्या आर्त, उदात्त अनुभूतीत याच धडपडीचा प्रत्यय येतो. ही धडपड कितीही मौलिक असली तरी, जोवर ती सूचक अथवा मौनप्रिय असते तोवरच तिची शान असते. तिची शब्दांत अभिव्यक्ती करण्याचा प्रयत्न केला की तो वायफळ, अर्थहीन ठरतो. त्या पलीकडल्या गोष्टीविषयी विधाने करणे अथवा त्यांच्याविषयीचे प्रश्नदेखील भाषेत उपस्थित करणे, हे निरर्थक असते.

अशा प्रकार विटगेनस्टाइनच्या मते, ''अर्थपूर्ण'' वक्तव्यांची तार्किक चिकित्सा केली की आपणांस निरर्थक वक्तव्यांची ओळख पटते. तत्त्वज्ञानातील विधांनाची निरर्थकता आपणांस कळून येते. शब्दबद्ध केलेल्या आध्यात्मिक समस्या या शब्दांत अनुत्तरणीय असतात. म्हणून त्या **कृतक समस्या (pseudo problems)** असतात, हे ध्यानी येते. थोडक्यात म्हणजे वक्तव्य काय ते नीट समजून घेतले की न वक्तव्य काय ते समजून येते.

हा पाठ विटगेनस्टाइनला *ट्रॅक्टेटस्* या ग्रंथादवारे द्यावयाचा होता. त्याच्या मते, वक्तव्य काय आणि न वक्तव्य काय, भाषेत नेमक्या कोणत्या गोष्टी सांगता येतात आणि कोणत्या सांगता येत नाहीत, किंवा अर्थपूर्ण वक्तव्य कोणते आणि निरर्थक वक्तव्य कोणते, ते विशद करुन सांगणे हीच तत्वज्ञानाची प्रधान समस्या होय. भाषेच्या मर्यादा ओळखणे किंवा वक्तव्याच्या प्रांताच्या सीमारेषा आखणे हेच तत्ववेत्यांचे कर्तव्य होय. म्हणून तो म्हणतो, ''विचारांच्या सीमारेषा आखणे हे या ग्रंथाचे उदिष्ट आहे. परंतु विचारांच्या सीमारेषा हा शब्दप्रयोग येथे तितकासा उचित नाही. कारण, विचारांच्या सीमारेषा आखण्यासाठी आपणासं त्या सीमारेषांच्या दोन्ही बाजूस नजर टाकावी लागेल. म्हणजेच ज्याच्याविषयी विचार करता येत नाही, त्याच्याविषयी विचार करावा लागेल. पण ते तर शक्य नाही. यास्तव, ''विचारांच्या सीमारेषा'' या शब्दप्रयोगाऐवजी विचाराभिव्यक्तीच्या अथवा भाषेच्या सीमारेषा हा शब्दप्रयोग करणे आधिक उचित होईल. भाषेच्या सीमारेषा आखणे किंवा वक्तव्याच्या मर्यादा दाखवून देणे हे या ग्रंथाचे उदिष्ट आहे.''**(ट्रॅक्टेटस् प्रस्तावना)**

थोडक्यात वि.च्या मते ''तत्त्वज्ञान म्हणजे एखादे दर्शन नाही, तर ती कृती आहे, आपल्या विचारांचे व विधानांचे तर्कशुध्द अर्थविवरण हे तत्त्वज्ञानाचे कार्य आहे.

विटगेन्स्टाईन चे हे म्हणणे म्हणजे भाषेच्या मर्यादाही सांगणे आहे. त्याच्या मते या मर्यादा पुढीलप्रमाणे :

## भाषेच्या मर्यादा

विटगेन्स्टाईनच्या मते विज्ञान, गणित व तर्कशास्त्र या ज्ञानशाखांमधील विधाने अर्थपूर्ण असतात. तसेच आपल्या नित्याच्या व्यवहारीतील विधानेही अर्थपूर्ण असतात , अशा विधानांना तो **'वक्तव्य विधाने'** म्हणतो .पण आध्यात्मशास्त्रीय किंवा सद्वस्तुशास्त्रीय विधाने मात्र निरर्थक व अर्थशून्य असतात. त्यामुळे त्यांच्याविषयी काहीही न बोलणे योग्य. अशा विधाननांन तो **'न-वक्तव्य विधाने'** म्हणतो. तत्ववेत्त्याने वक्तव्याचा व न-वक्तव्याचा प्रांत ओळखला पाहिजे, तेच त्याचे काम आहे. तो म्हणतो *: तत्त्वज्ञान हे नवनवीन , सद्वस्तुशास्त्रीय विधाने रचित नाही. ते फक्त 'अर्थपूर्ण ' विधानांचे अर्थ-विवरण करते* .(ट्रॅक्टेटस 4.112)

तत्ववेत्त्याचे व तत्त्वज्ञानाचे खरे काम कोणते ? तर आपल्या भाषेची रचना कोणत्या प्रकारच्या विधानांनी करावी . ही होय. आपले प्रत्येक विधान अर्थपूर्ण असेल अशी खबरदारी घेणे आवश्यक असते, पण अशी अर्थपूर्ण विधाने केवळ विज्ञान, गणित व तर्कशास्त्रात तसेच आपल्या दैंनदिन भाषेत असतात. पांरपरिक तत्त्वज्ञान मात्र नेहमी सद्वस्तुशास्त्रीय विधाने करते जी नेहमी निरर्थक असतात.

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

याचा अर्थ असा की अर्थपूर्ण विधाने शोधली की निरर्थक विधानेही समजून येतात. अर्थपूर्ण विधाने ही **'वक्तव्य विधाने'** असतात तर निरर्थक विधाने ही **'न-वक्तव्य विधाने '** असतात. आणि आपली भाषा इथे थांबते.तिला इथे मर्यादा पडतात. काय सांगता येते आणि काय सांगता येत नाही, हीच तत्वज्ञानाची प्रधान समस्या असून भाषेच्या मर्यादा ओळखणे हे तत्त्ववेत्त्याचे काम आहे. अशारितीने आपली भाषा न-वक्तव्याच्या प्रांतात घुसू न देणे , ही मर्यादा होय.

## तत्त्वज्ञान म्हणजे भाषेची चिकित्सा



विटगेन्स्टाईनच्या मते तत्त्वज्ञान म्हणजे भाषेची चिकित्सा होय. ही चिकित्सा करताना तो तत्त्वज्ञानाचा संबंध मुख्यत: विज्ञान, तर्कशास्त्र,व भाषा यांच्याशी जोडतो.त्याच्या मते तत्त्वज्ञानातील समस्यचंचे स्वरुप मोठे वैशिष्ट्यपूर्ण असते. त्या कूट, जटील असतातच पण त्यांचे एकच एक विश्वसनीय उत्तर सापडत नाही. तत्त्ववेत्त्यामध्ये एकवाक्यता कधीही येत नाही. असे का व्हावे ? विटगेन्स्टाईनच्या मते याचे कारण असे की ''आपल्य भाषेत एकप्रकारचे तर्कशास्त्र दडलेले असते. ते नीट न समजल्यामुळे तात्त्विक समस्या उद्भवतात . भाषेचे तर्कशास्त्र लक्षातच न घेतल्याने मिथ्या स्वरुपाच्या तत्त्वज्ञानात्मक समस्या निर्माण होतात. जेंव्हा तत्त्ववेत्ता भाषा कशीही वापरतो, त्याचे नियम पाळत नाही, तेंव्हा प्रश्न निर्माण होतात , म्हणून विटगेन्स्टाईन म्हणतो की ***''भाषा सुट्टीवर गेली की तत्त्वज्ञान निर्माण होते ! ''***

अशा या सुट्टीवर गेलेल्या भाषेला कामाला लावले की ती योग्य ते कार्य करेल. ते कार्य म्हणजे आपले खरे प्रश्न कोणते व खोटे प्रश्न कोणते , हे ओळखणे आणि ते सारे प्रश्न सुटे सुटे सोडविणे .

विटगेन्स्टाईनच्या मते सर्वसाधारणपणे भाषेतील दडलेले तर्कशास्त्र लक्षात घेतले जात नाही कारण नेहमी भाषा व्याकरणाच्या मदतीने चालविली जाते , पण हे व्याकरण व त्या भाषेचे तर्कशास्त्र भिन्न असते. व्याकरणातून कधी कधी दिशाभूलही होते . उदा. सोन्याचा पर्वत अस्तित्वात नाही . हे विधान व्याकरणदृष्ट्या योग्य आहे , त्यात काहीही चूक वाटत नाही. कारण वास्तवात खरोखरीच असा पर्वत नसतो ! पण मुळात सोन्याचा पर्वत हे **विधेय** अवास्तव आहे, हे या दर्शनी व्याकरणात लक्षात घेतलेले नसते. तेथे केवळ नकार लक्षात घेतलेला असतो .

भाषेमागील तर्कशास्त्र सांगते की ***सोन्याचा पर्वत*** अशी काही संकल्पना अस्तित्वात नसते ! मात्र तत्वज्ञ तसे समजतो व त्यावर काथ्याकूट करीत बसतो . या विधानाप्रमाणेच 'आत्मा अमर आहे ' हे विधान आहे . या विधानाततील विधेयाच्या जागी असलेली ***आत्मा*** ही संकल्पना खरोखरीच अनुभवाला येते की नाही, याचा विचारच न करता ती संकल्पना त्या विधानाचे व्याकरण सांगते म्हणून तो म्हणजे आत्मा अमर मानला जातो. शिवाय असे अमरत्व मानते कोण ? तर जे कधी तरी मरणारच असतात ते लोक ! त्यामुळे अशा फसव्या व्याकरणापासून सावध राहून भाषेच्या अंतरंगात लपलेले तर्कशास्त्र समजावून घेतले तर तात्विक समस्यांचे खरे स्वरुप लक्षात येईल, असे विटगेन्स्टाईनच्या म्हणतो. म्हणूनच अशा सामान्य भाषेचे विश्लेषण करणे , तिची चिकित्सा करणे , हे तत्त्वज्ञाचे काम आहे .

## रसेलचे आक्षेप

मात्र यावर रसेल आक्षेप घेतो की सामान्य भाषा काही बाबतीत, उदा. व्यवहारातील गरजा भागविण्यासाठी पुरेशी असली तरी शास्त्रीय व तत्त्वज्ञानात्मक प्रश्न सोडविण्यास अपुरीच आहे. त्यामुळे नवीन पारिभाषिक भाषा , कृत्रिम भाषा निर्माण करणे योग्य ठरेल, असे विटगेन्स्टाईनला म्हणावयाचे आहे. यावर विटगेन्स्टाईनचे उत्तर असे की ''रसेलला माझे म्हणणे कळालेलेच नाही. मला अशी कोणतीही खास तार्किक भाषा तयार करावयाची नाही , उलट आपली नेहमीचीच भाषा सर्व समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त आहे, असाच माझा दावा आहे. माझे म्हणणे फक्त एवढेच आहे की त्याभाषेत तर्कशास्त्र लपलेले आहे , ते जर लक्षात घेतले तर समस्या सोडविणे सोपे जाईल !''

विटगेन्स्टाईन पुढे म्हणतो की जगात अनेक भाषा आहेत, त्या नेहमीच्या आहेत, त्या आपली उद्दिष्टे पूर्ण करतात , त्या एकमेकांना समजतात. कधी कधी त्यांचा अर्थ धूसर असतो , संदिग्ध असतो. पण हा दोष काढता येतो. त्यात अवघड काहीच नाही. त्या भाषा नाकरणे मुर्खपणाचे ठरेल. सामान्य भाषेचा सद्गगुण म्हणजे ती संद्गिग्ध, म्हणजे

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



तर्कदुष्ट्या सदोष असुनही जीवनच्या व्यवहारात ती उपयुक्त आहे आणि हेच महत्वाचे आहे. तथापि दुदैवाने रसेल ही बाब लक्षात घेत नाही !

विटगेन्स्टाईनच्या मते मानवजातीच्या इतिहासात विकसित झालेल्या प्रत्येक नैसर्गिक भाषेचा भोवतालच्या वास्तवतेशी संबंध असतो, तसा नसता तर आपलीच पंचाईत जाली असती ! ही भाषा नेहमी व्याकरणीच्या दृष्टीने पूर्ण असतातच असे नव्हे, ती अधवट अपूर्ण उच्चारली गेली तरी त्यांचा अर्थ कळतोच, उदा. '' तू ना अस्सा आहेस ना ….. '' किंवा '' अश्शी आहेस ना ….' म्हणजे नेमकी कशी आहे , हे त्या व्यक्तिला बरोबर कळत असते. त्यामुळे नवी तार्किक भाषा निर्माण करण्याच्या फंदात न पडता आहे त्या सामान्य भाषेचीच , त्यामागे दडलेल्या तर्कशास्त्राचे स्पष्टीकरण करावे , तेच तत्त्वज्ञाचे काम आहे.

## विटगेन्स्टाईनचा भाषाविषयक सिद्‌धान्त

विटगेन्स्टाईनने विज्ञान व तत्त्वज्ञान यांना विसाव्या शतकात अत्यंत वेगळे वळण दिले.त्याच्यात मते तत्त्वचिंतन ही एक कृती आहे. विश्लेषण करणे, हे कृतीचे स्वरुप आहे.ते या दृश्य जगाचे आणि त्याचे वर्णन ज्या भाषेत केले जाते त्या भाषेचे असते. त्याच्या मते भाषाविश्लेषण म्हणजेच जगाचेच विश्लेषण होय. अन् हेच तत्त्वज्ञानाचे मध्यवर्ती सूत्र आहे. भाषेची अर्थनिश्चिती ही जगाची अर्थनिश्चिती असते. त्याच्या अर्थनिश्चितीचा निकष म्हणजेच अनुभव होय. ही अर्थनिश्चिती विटगेन्स्टाईन दोन भूमिकांमध्ये माडंतो. *'ट्रॅक्टेटस'* मध्ये तो अर्थविषयक चित्रसिध्दान्त मांडतो तर *'इन्व्हेस्टिगेशन्स'* मध्ये भाषाविषयक क्रिडासिध्दान्त मांडतो.त्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे :

### अ) भाषाविषयक चित्रसिदधान्त :

आपली भाषा व या जगाचे काही एक नाते आहे का ? विधान व वस्तुस्थिती यांच्या कोणत्या प्रकारचा संबंध आह ? या प्रश्नाचे त्याचे उत्तर म्हणजे ' विधान हे वस्तुस्थितीचे तार्किक चित्र असते ! ' हाच त्याचा चित्रसिध्दान्त होय.

विटगेन्स्टाईनच्या जगाचे विश्लेषण अत्यंत वेगळ्या पध्दतीने करतो . त्याच्या मते हे जग अनंत वस्तूनी आणि तथ्यांनी (facts) भरलेले आहे मात्र या वस्तु कशाही फेकलेल्या नाहीत. त्यांची काहीएक विशिष्ट प्रकारची मांडणी केलेली असते. ही एक विशिष्ट रचना असते. प्रत्येक घटना किंवा वस्तू स्वतंत्र असतात. पण प्रत्येक घटना-वस्तू एकमेकाशी बांधलेली असते. एक दुसरीशी,दुसरी तिसरीशी, तिरी चौथीशी , चौथी पाचवीशी … रचलेली असते. या रचनांनी मिळून जे बनते त्यास **'तथ्य'**(fact) म्हणतात. आणि अशा तथ्यांनी मिळून जगाची रचना पूर्ण व अर्थपूर्ण होते. अन्यथा ती निरर्थक होते. एका अर्थाने जग म्हणजे रचनांची रचना असते !

थोडक्या विटगेन्स्टाईनच्या मते जग म्हणजे अनेक तथ्यांनी बनलेले असते. ही तथ्ये म्हणजे विशिष्ट रचना असतात. प्रत्येक रचना इतर रचनेशी विशिष्ट नात्याने बांधली गेलेली असते. त्या रचनेतून आकाराला येणारी वस्तुस्थिती म्हणजे **'' आण्विक वस्तुस्थिती ''**. ती ज्या विधानातून व्यक्त होते ते विधान म्हणजे **'मूल विधान'**. जग म्हणजे अशी आण्विक वस्तुस्थिती व विधान यांच्यातील एकास एक संबंध होय . हा संबंध तार्किक असतो. असा संबंध असेल तरच ते विधान म्हणजे त्या घटनेचे ते चित्र होय. म्हणून विधान म्हणजे वस्तुस्थितीचे चित्र होय , हाच विटगेन्स्टाईनचा भाषाविषयक चित्रसिद्धान्त होय.

हे उदाहरणाने पाहू. समजा ''तृतीय वर्ष तत्त्वज्ञान विशेष विषयाच्या वर्गात प्राध्यापक शिकवित असून दोन विद्यार्थी बसलेले आहेत'' हे एक विधान असून ते वस्तुस्थिती सांगते, असे सकृतदर्शनी वाटते.पण विटगेन्स्टाईनच्या मते हे योग्य विधान नव्हे,कारण ते तार्किक विधान नाही, त्यातून कसलाच बोध होत नाही. ते अर्थपूर्ण नाही. ते जर चित्र विधान व्हावयाचे असेल तर ते पुन्हा पुढीलप्रमाणे मांडावे लागेल : '' तृतीय वर्ष विशेष तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक महोदय`का लाकडी खुर्चीत बसलेले असून त्यांच्यासमोरील टेबलावर काही पुस्तके व वह्या आहेत. त्यांच्या समोर बारा बाकडी असून डावीकडे सहा व उजवीकडे सहा बाकडी अशी मांडलेली आहेत. ही बाकडी दोनदोनच्या रांगामध्ये आहेत. डाव्या रांगेतील शेवटच्या रांगेत एक विद्यार्थिनी असून तिने निळा पोशाख म्हणजे सलवार खमीज व ओढणी असे कपडे

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



परिधान केले आहे. तर उजव्या रांगेतील दुसऱ्या बाकड्यावर एक विद्यार्थी बसला असून तो खेड्यात राहणारा आहे , हे त्याच्या पोशाखावरुन जाणवते. वर्गात गंभीर वातावरण असून कोणत्यातरी महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा चालू असावी, असे दिसते. '' या विधानास *तार्किक विधान* म्हणावे, कारण त्यातुन काहीतरी बोध होतो . ते विधान एक चित्र उभे करते. अशा विधानास विटगेनस्टाईन ***'तथ्य विधान'*** म्हणतो.कारण ते तथ्य स्पष्ट करते. ते विधान तथ्याचे चित्र रंगवते.

थोडक्यात विटगेनस्टाईनच्या मते आपली भाषा व जग यांच्यात एकासएक संबंध असतो. जगाची रचना व भाषेची रचना समान असते. तेंव्हाच भाषा जगाचे चित्र बनते. हे नाते तर्कामुळे शक्य होते. तर्क हा भाषा व जग यांच्यातली समानतेचा दुवा असते. ज्याप्रमाणे रेषा व रंग वापरुन कागदावर चित्र रंगविले जाते त्याप्रमाणे शब्द , त्यांची अर्थपूर्ण विधानरचना करुन आपण वस्तुस्थिती किंवा जग उभे करतो. आणि जगाचे स्वरुप सांगणे हेच भाषेचे कार्य असते !

भाषा आणि वास्तवता, विधान आणि वस्तुस्थिती या दोहोमध्ये कोणत्या प्रकारचा संबंध आहे या प्रश्नास विटगेनस्टाइनचे उत्तर असे की, ''प्राथमिक विधान हे आण्विक वस्तुस्थितीचे तार्किक चित्र असते.'' हा त्यांचा सुप्रसिद्ध भाषाविषयक चित्र सिद्धान्त होय.

प्राथमिक विधानात नामे असतात, परंतु ज्याप्रमाणे संगीतात सुरांचा नुसता गोंधळ अथवा गोंगाट नसतो, त्याचप्रमाणे प्राथमिक विधानात नामांची नुसती जंत्री नसते. तेथे नामांची व्यवस्थित मांडणी असते. आणि त्या मांडणीत वास्तवतेमधली ''आण्विक वस्तुस्थिता'' दर्शविलेली असते. त्या आण्विक वस्तुस्थितीमध्ये सृष्टीची आद्य, निरवयव ''मूळद्रव्ये'' असतात. त्या मूळदव्यांचा प्राथमिक विधानामधल्या ''नामा'' नी निर्देश होतो.

आण्विक वस्तुस्थितीमध्ये मूळद्रव्यांची जशी गुंफण झालेली असते, तशीच प्राथमिक विधानात नामांची गुंफण झालेली असते. आण्विक वस्तुस्थितीमधली मूळद्रव्ये आणि प्राथमिक विधानांमधली नामे ही परस्परांस समांतर असतात. त्यांच्यामध्ये एकास एक असे नाते असते. त्यामुळे नामांच्या द्वारे आपणास मूळ, द्रव्यांशी संपर्क साधता येतो. आणि विधानांद्वारे वस्तुस्थितीचे दर्शन घेता येते.

भाषेच्या मदतीने आपण आपले सारे विचारमंथन करतो. सृष्टीविषयी ज्ञान मिळवितो, जगाविषयी वक्तव्ये करतो आणि जीवनाचे परोपरीचे व्यवहार करतो. साहजिकच, भाषा आणि जग या दोहोमध्ये काही ना काही संबंध साम्य अथवा समान सूत्र असले पाहिजे. विटगेनस्टाइनच्या मते, या दोहोमधले साम्य तार्किक स्वरुपाचे आहे. आण्विक वस्तुस्थिती आणि प्राथमिक विधान, सृष्टी आणि भाषा या दोहोना तार्किक रचनाकृती समान असतात.

तर्क हा भाषा आणि सृष्टी या दोहोंमधील दुवा आहे. विज्ञानाची भाषा तर्कानुसारी असते. म्हणून, त्या भाषेत सृष्टीचे अनुभवगम्य व्यवहार उलगडता येतात. तर्क हा सामान्य भाषेतही सामावलेला आहे. म्हणून, सामान्य भाषेच्या मदतीने आपण सृष्टी-व्यापारांविषयी बरेच काही बोलू शकतो. तार्किक आकृतिबंध हे सृष्ट पदार्थात, तसेच भाषेच्या अंतरंगातही नांदतात. त्यामुळे भाषा ही सृष्टीचे तार्किक चित्र बनू शकते. विटगेनस्टाइन म्हणतो की, ''माझी विचारधारा तर्कशास्त्राच्या पायाभूत तत्त्वांपासून सृष्टीच्या मूलगामी रचनाकृतीकडे धाव घेत असते.''

## **ब**) अर्थाचा उपयोग सिद्धान्त (**भाषाविषयक खेळ सिदधांत** )

मात्र नंतर विटगेनस्टाईनने आपला स्वत:चाच सिदधान्त नाकारला किंवा दुरुस्त केला. त्याला या सिदधान्तातील चुका लक्षात आल्या, तो अपुरा असल्याचे लक्षात आले आणि त्याने एकदम विरुध्द स्वरुपाचा सिद्धान्त मांडला. चित्रसिद्धांतातील एक महत्वाचा दोष असा होता की जगाचे वर्णन हेच भाषेचे एकमेव कार्य आहे , असे समजले गेले , ते चुकीचे आहे. आपली भाषा केवळ जगाचे , वस्तुस्थितीचे वर्णन करत नाही तर ती आपली अनेक कामे करते, तिचे अनेक उपयोग आहेत, असे विटगेनस्टाईनच्या लक्षात आले. शब्दाला अनेक अर्थ असतात, ते त्याच्या संदर्भानुसार ठरतात, त्यांच्या वापरानुसार ठरतात, सामान्यभाषा या कारणांमुळेच अर्थपूर्ण बनते असे त्याच्या लक्षात आले .त्यामुळे त्याने नवा सिध्दान्त मांडला तो म्हणजे '' **भाषाविषयक खेळ सिद्धान्त** '' होय.

या सिद्धान्तानुसार कोणत्याही शबद्‌ाचा अर्थ तो ज्या हेतूसाठी वापराला गेला आहे, त्यात तो नसतो. कारण भाषेतील शब्द नेहमी विविध अर्थाने वापरले जातात, संदर्भानुसार त्यांचे अर्थ बदलतात, निश्चित होतात. याचा अर्थ शब्द

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



एकच असला तरी त्याचे अर्थ लवचिक असतात,उदाहरणार्थ , '' तू फार शहाणा आहेस '' यातील शहाणा हा शब्द ते विधान कुणी, कुणाला, कोणत्या वेळी , कोणत्या प्रसंगात वापरले आहे यावर निश्चित होते. बुध्दिमान , मुर्ख की गाढव , हे त्या शब्दाच्या वापरावर , संदर्भावर ठरते.याचा अर्थ असा की शब्दाचा अर्थाचा निकष ठरविता येत नाही ! त्यामुळेच त्याच्या उपयोगाचे नियम ठरविता येत नाहीत.

याचा अर्थ असा की भाषा ही चित्रासारखी नसते. मग ती कशी असते ? तर ती खेळासारखी असते. आपण नाना प्रकारचे खेळ खेळतो, तसेच नाना पध्दतीने भाषा वापरतो. म्हणजेच शब्दाच्या वापराचे नियम सांगता येत नसले तरीही भिन्न क्षेत्रात शब्दार्थ निश्चित करण्यासाठी मात्र नियम असतात. हे नियम निश्चित करन्यामागे विविध अर्थप्रणाली असतात, त्यांनाच **'खेळ'** म्हंटले जाते.

विटगेनस्टाईन भाषेला सुताराच्या हत्याराच्या पिशवीची उपमा देतो. या पिशवीत जसे करवत, हातोडा पक्कड खिळे , कानस इत्यादी हत्यारे असतात, तसे भाषेच्या पिशवीतही अनेक शब्द असतात. सुतार जसा वेगवेगळ्या कामासाठी वेगवेगळी हत्यारे वापरतो तसेच भिन्न काराणासाठी आपण शब्द वापरतो, त्यामुळे विटगेनस्टाईन म्हणतो की 'आता, आपण ''अमुक अमुक शब्दाचा वापर कसा होतो ? '' असा प्रश्न विचारण्याऐवजी ''अमुक अमुक शब्दाचा प्रत्यक्षात वापर कसा होतो ? असा प्रश्न विचारला पाहिजे. आज्ञा देण्यासाठी, इच्छा दर्शविण्यासाठी, उपदेश करण्यासाठी, प्रेम व्यक्त करण्यासाठी, प्रार्थना करण्यासाठी,अभिनय करण्यासाठी, भाषांतर करण्यासाठी, शिव्या-अपमान करण्यासाठी,समस्यासूत्रणासाठी अशा अनंत कारणांसाठी भाषा वापरली जाते. हा सगळा एकप्रकारचा खेळ असतो.

आता शब्दाचा अर्थ जर असे संदर्भानुसार ठरु लागले तर त्यांच्यात समानता कुठे आढळते ? त्यांना जर समान असे काहीही नसेल तर त्यांना एक विशिष्ट नाव कसे देता येईल ? यावर विटगेनस्टाईन म्हणतो की क्रिकेट , कबड्डी , पत्ते , खो-खो , भातुकली इ. खेळांमध्ये काय समान आहे ? तर काहीच नाही . कारण प्रत्येक खेळाचे नियम वेगळे आहेत , एकाचे दुसऱ्याला लागू पडत नाहीत . तसेच शब्दाचे नियम असतात. पण सर्व खेळांन मिळून काहीही समान नसले तरी त्या सर्व खेळांमध्ये **'खेळपणा '** नावाचा काहीतरी घटक असतो ! या खेळपणामुळे सर्व खेळांचे जणूकाही एक कुटंब बनते , त्या कुटूंबाचा प्रत्येक खेळ सदस्य असतो . अगदी तसे सर्वप्रकारच्या (मराठी , हिंदी , जर्मन , फ्रेंच , तेलगू , संस्कृत इ. इ.) भाषांमध्ये काहीतरी समान मानता येईल, ते म्हणजे त्यांचे 'भाषा असणे ' होय. ज्या प्रमाणे खेळ म्हणजे विविध क्रीडाप्रकाराचे एक ' कुटूंब असते , त्याचप्रमाणे भाषा म्हणजे विविध प्रकारच्या वाक्यांचे आणि शब्दांचे एक ' कुटूंब ' असते . ज्याप्रमाणे सगळ्या खेळांना एकचएक असे समान लक्षण सांगता येत नाही , त्याप्रमाणे सर्व भाषा व शब्द यांच्या वापरामध्ये समान लक्षण सांगता येत नाही. त्यांच्या वापरात असते ते फक्त ' कौटंबिक सामर्थ्य ' किंवा कुलसाम्य . एकाच कुलात(भाषा) असल्याने त्यांना भाषा हे नाम मिळते.

जसा प्रत्येक खेळ आपापल्या नियमानुसार खेळला जातो , तशी प्रत्येक भाषा आपापल्या नियमानुसार खेळली जाते. प्रत्येक खेळ 'खेळ' या कुटंबात येत असला तरी आपल्या स्वतंत्र कुटंबात तो स्वतंत्र नियमांनीच खेळत असतो. खेळ अर्थपूर्ण यशस्वी होण्यासाठी त्या खेळाच्या यिनमानुसारच खेळावा लगतो , एका खेळाच्या नियमाची गल्लत दुसऱ्या खेळाच्या नियमाशी करता येत नाही.

अगदी तसे एका भाषेचे नियम दुसऱ्या भाषेला लागू करता येत नाहीत , शिवाय एका शब्दचे नियम दुसऱ्या शब्दाल लागू करता येत नाहीत. एकच शब्द, एकच भाषा संदर्भानुसार वेगवेगळी खेळली जाते. हा एक प्रकारचा भाषाखेळच असतो ! एका संदर्भातील , एका क्षेत्रातील अर्थ दुसऱ्या संदर्भात किंवा क्षेत्रात लागू करण्याचा प्रयत्न केला तरी गैरसमज होतो !! गेली 2000 वर्षे असेच घडत आल्यामुळे फसवे , दिशाभूल करणारे अध्यत्मशास्त्र , सत्ताशास्त्र निर्माण झाले व समाजाची सतत फसवणूक झाली . त्यातून तत्त्वज्ञानात अनंत निरर्थक , अर्थहीन प्रश्न निर्माण झाले .
यावरुन आपलया हे लक्षात येईल की भाषेविषयी ज्या दोन प्रकारचे प्रश्न उदभवतात ते 1) भाषेच्या अर्थाविषयी आणि 2) भाषेच्या प्रयोगाविषयी, वक्वव्याविषयी असतात. भाषेच्या अर्थाविषयी उदभवणारे प्रश्न हे भाषेच्या जडणघडणी विषयीचे आणि अर्थाविषयीचे असतात आणि त्यांचा विचार व्याकरणशास्त्र, भाषा-रचनाशास्त्र अथवा विन्यासशास्त्र (syntax)

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



अर्थशास्त्र (Semantics) ही विविध शास्त्रे करतात. तर भाषेच्या प्रयोगाविषयी उदभवणारे प्रश्न हे भाषेच्या वापराविषयीचे, तिच्या उपयोगाविषयीचे असतात आणि त्यांचा विचार प्रयोगशील भाषाविज्ञान (Pragmatics) करीत असते. भाषेचा विचार शुद्ध वैज्ञानिक दृष्टीकोनातूनही करण्यात येतो. त्याला ***भाषाशास्त्र*** असे म्हणतात. अर्थातच भाषिक तत्वज्ञान आणि भाषाशास्त्र (Linguistics) यामध्ये जसा दृष्टीकोनाचा भेद आहे. तसाच भाषिक तत्त्वज्ञान आणि व्याकरणशास्त्र यामध्येही आहे.

या पार्श्वभूमीवर विट्गेनस्टाइन यांच्या अर्थविषयक उपपत्तीविषयी असे म्हणता येईल की त्यांच्या Tractatus मध्ये त्यांनी भाषेच्या जडणघडणीचा, तिच्या रचनेचा, विचार केला आणि आपली चित्र-उपपत्ती (Picture Theory) विधान वस्तुस्थीचे वर्णन करते. समोर मांडली परंतु या उपपत्तीच्या मर्यादा त्यांच्या लक्षात आल्याने पुढे Philosophical Investigations मध्ये त्यांनी भाषेच्या प्रयोगाला, वापराला महत्व दिले. ते म्हणतो,“ It is interesting to compare the multiplicity of the tools in language and of the ways they are used, the multiplicity of kinds of words and sentence, with what logicians have said about the structure of language (Including the author of the Tractatus Logic- Philosophicus)"

या ठिकाणी शब्दांचे अथवा वाक्यांचे अर्थ कसे निर्धारित होतात, या विषयीचा सिद्धान्त विटगेनस्टाईनने Philosophical Investigations मध्ये मांडला आहे. हा विचार प्रामुख्याने पहिल्या भागातील 37-38 परिच्छेदांमध्ये केलेला आहे. तो पुढील प्रश्न उपस्थित करतो :

1] शब्दांना अर्थ कसा प्राप्त होतो ?

2] वाक्यांना अर्थ कसा प्राप्त होतो ? आणि

3] शब्दांचा अथवा वाक्यांचा अर्थ आपणास समजतो, आकलन होतो, म्हणजे काय ?

या प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी एका महत्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते आणि तो म्हणजे विटगेनस्टाइन यांचा तत्वज्ञानासंबंधीचा, त्यांच्या स्वरुपविषयीचा, दृष्टीकोन होय. हा दृष्टीकोन ध्यानात घेतलयास त्यांची अर्थविषयक उपपत्ती आपणास समजू शकेल. तत्वज्ञान म्हणजे चिरप्रस्थापित, चिरंतन, अशा सिद्धांतांची एक व्यवस्था असते हे मत विटगेन्स्टाइन यांना मान्य नाही. त्यांच्या मते तत्वज्ञान म्हणजे तत्वचिंतन होय आणि चिंतन करणे म्हणजे एक प्रकारची कृती करणे होय. अशी कृती नित्यनूतन असते. म्हणूनच विटगेन्स्टाइन यांनी तत्वज्ञानाला एक उपक्रम असे म्हटले आहे आणि ज्या भाषेच्या साहयाने आपण हा उपकम करीत असतो त्या भाषेचे स्वरुप समजण्यासाठी विभिन्न परिस्थितीमध्ये, विभिन्न संदर्भामध्ये, त्या भाषेचा कसा वापर होतो ते आपण समजून घेतले पाहिजे. अशी विटगेन्स्टाइन यांची भूमिका आहे.

भाषेचा असा वापर करणे म्हणजेच भाषेच्या साहयाने एक प्रकारचा खेळ खेळण्यासारखेच आहे असे विटगेन्स्टाइन समजतो. कारण, जसे एखादा खेळ खेळण्यासाठी सामान्यपणे कमीत कमी दोघांची आवश्यकता असते आणि कोणत्या तरी वस्तुच्या साह्याने तो खेळला जातो, तसेच भाषेचा प्रयोग करीत असतानाही सामान्यपणे कमीत कमी दोघांची वक्ता आणि श्रोता यांची आवश्यकता असते आणि भाषेचा वापर एक माध्यम म्हणून करण्यात येतो. इतकेच नव्हे तर जसे कोणताही खेळ हा त्या खेळाच्या विशिष्ट नियमांनुसार खेळला जातो, खेळला जावयास पाहिजे, तसेच भाषेचा विशिष्ट संदर्भामध्ये प्रयोग होत असताना तो विशिष्ट नियमांनुसारच होत असतो, व्हावयास पाहिजे. याप्रमाणे एखादा खेळ खेळणे आणि भाषेचा प्रयोग करणे यामध्ये एक प्रकारची अनुरुपता आढळते. म्हणूनच विटगेनस्टाइन **भाषा- खेळ (Language game)** ची कल्पना मांडतो. विटगेन्स्टाइनला ही कल्पना फूटबॉलचा खेळ पाहून सुचली.[1]

विटगेन्स्टाइनच्या मते

1) शब्दांना जो अर्थ प्राप्त होतो तो त्यांच्या प्रयोगाविषयीच्या नियमांमुळे प्राप्त होत असतो.

2) शब्दांना त्यांच्या भिन्न संदर्भातील प्रयोगामुळे भिन्न अर्थ प्राप्त होत असतात.

---

[1] नॉर्मन माल्कम : Ludwig Wittgenstein : a Memoire (Oxford, 1958), P. 65)

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



संभाषणातील शब्दाच्या या विविध उपयोगांना, प्रयोगांना, वापर करण्यालाच विटगेन्स्टाइन **''भाषा-खेळ''** असे म्हणतो. अशा भाषा-खेळांची काही उदाहरणे विटगेन्स्टाइन खालील प्रमाणे देतो.

1] आज्ञा करणे, आणि त्यांचे पालन करणे.
2] वस्तूचे वर्णन करणे अथवा तिची लांबी-रुंदी सांगणे.
3] वर्णनावरुन वस्तू तयार करणे (जसे चित्र काढणे.)
4] एखाद्या घटनेविषयी वार्ता देणे.
5] एखादया घटनेविषयी अंदाज करणे.
6] अभ्युपगम मांडणे आणि त्यांची चाचणी करणे.
7] तक्ते आणि आकृत्या यांच्या साहाय्याने एखाद्या प्रयोगाची फलिते सादर करणे.
8] एखादी कथा तयार करणे आणि तिचे वाचन करणे.
9] नाटक करणे.
10] उखाणे सांगणे.
11] कोडयांचा अदांज बांधणे.
12] विनोद करणे आणि सांगणे.
13] व्यावहारिक अंकगणितातील उदाहरणे सोडविणे.
14] एका भाषेचे दुस-या भाषेत भाषांतर करणे.
15] विचारणे, आभार मानणे, शिव्या-शाप देणे, अभिवादन करणे, प्रार्थना करणे.

अशी असंख्य प्रकारची उदाहरणे भाषेत आढळतात असे विटगेन्टाइन समजतो. त्याच्या मते, ''भाषेच्या साहायाने जे व्यवहार आपण करीत असतो त्यांची गणना होऊ शकत नाही. ते असंख्य आहेत, भिन्न आहेत. त्यात भर पडत असते तर कधी त्यात घट होत असते. परंतु असा व्यवहार करणे आपल्या जीवनसरणीचा, जीवनाच्या आकाराचा एक भाग आहे, एक अविष्कार आहे.''[2]

**The Great Question**

आता, या ठिकाणी एक महत्वाचा प्रश्न असा उपस्थित होतो. तो असा की या भिन्न भाषा-खेळांमध्ये काही समान घटक, काही समान लक्षण, असतात काय ? कारण ज्या अर्थी सर्व भाषा-खेळांना खेळ म्हणावे किंवा या सर्व खेळांना भाषा खेळ म्हणावे, असे विट्गेनस्टाईन म्हणतो त्या अर्थी त्या सर्व भाषा-खेळात काहीतरी समान घटक अथवा लक्षण असले पाहिजे. हा प्रश्न भाषेच्या सारतत्वाशी (Essence of language) निगडीत आहे, असे विट्गेनस्टाईन म्हणतो . म्हणूनच या प्रश्नाला विटगेन्स्टाइन **`the great question'** असे संबोधितो (PI.1.65) आणि त्यांचे स्वरुप असे सांगतो, ''What the essence of a language game, and hence of a language, is : what is common to all these activities and what makes them into language or parts of language." "……. I am saying that these phenomena have no one thing in common which makes us use the same word for all-but that they are related to one another in many different ways. And it is because of this relationship or these relationships, that we call them all "language"

[2] But how many kinds of sentences are there ? Say, assertion, question, and command? There are countless kinds : countless different kinds of use of what we call 'symbols', 'words', 'Sentences' And this multiplicity is not something fixed, given for all but new types of language, new language- games as we may say, come into existence, and others become obsolete and get forgotten. Here the term language –game is meant to bring into prominence the fact that the speaking of language is part of an activity, or a **form of life**

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



म्हणजेच सर्व भाषा-खेळांना आपण भाषा खेळ आणि भाषा खेळ म्हणत असलो तरी याचा अर्थ या सर्व उपक्रमांमध्ये (activities) कोणतातरी एक समान घटक अथवा काही तरी एक समान लक्षण असते असे नसून त्या उपक्रमांचा परस्परांशी असलेला जो संबंध आढळतो त्यामुळे त्या सर्व उपक्रमांना आपण भाषा-खेळ म्हणतो. हा संबंध त्यामधील साम्यावर आधारलेला असतो. परंतु हे साम्यही विशिष्ट बाबतीतच असते असे नसून कधी काही बाबतीत तर कधी इतर बाबतीत आढळणारे असते. इतकेच नव्हे तर साम्य असलेलया या बाबी एकमेकांत अशा मिसळलेया आढळतात की त्यांचे एक प्रकारचे जाळेच (network) तयार होते. अशा आढळणा-या साम्यांना विटगेनस्टाइन कुल साम्य (family resemblance) असे म्हणतात. म्हणजे, ज्याप्रमाणे एखाद्या कुटुंबातील व्यक्तीमध्ये बांधा, उंची, डोळ्यांचा रंग, वर्ण इत्यादी बाबतीत जे काही साम्य आढळते ते अगदी तंतोतंत नसले आणि विशिष्ट बाबतीतच नसले तरीही एखादी व्यक्ती विशिष्ट कुटुंबातील आहे हे ठरविण्यापुरते साम्य आपल्याला आढळत असते. त्या कुटुंबातील सर्व व्यक्तीमध्ये याप्रमाणे कोणताही एक असा समान घटक अथवा कोणतेही एक समान लक्षण आपल्याला आढळत नसते. तरीही या सर्व व्यक्ती एकाच कुटुंबातील आहेत असे आपण म्हणतो. नेमके असेच आपणाला खेळासंबंधी म्हणता येते आणि भाषेसंबंधीही म्हणता येते. सर्व खेळांना आपण खेळ म्हणतो, कारण त्या सर्वामध्ये एखादा समान घटक आहे म्हणून नव्हे, तर ते सर्व खेळ एकाच कुलाचे सदस्य असतात म्हणून ! त्या खेळामध्ये तंतोतंत साम्य आणि तेही सर्व बाबतीत नसले तरी एखादा उपक्रम (activity) हा खेळ आहे हे ठरविण्यापुरते त्यात साम्य आढळत असते.

निरनिराळया शब्दांना त्यांच्या निरनिराळ्या कार्यामुळे निरनिराळ्या प्रयोगांमुळे, अर्थ प्राप्त होतो असे विटगेन्स्टाइन समजतात. इतकेच नव्हे तर, एकाच शब्दाला त्याच्या विभिन्न संदर्भातील भिन्न प्रयोगांमुळे अनंक अर्थ प्राप्त होत असतात असेही ते समजतात. हे स्पष्ट करण्यासाठी विटगेन्स्टाइन शब्द आणि उपकरणे (tools) यांची तुलना करतात. ते म्हणतात, “Think of the tools in a tool-box, there is a hammer, pliers, a saw, a screw-driver, a glue-pot, glue, nails and screws. The functions of words are as diverse as the functions of these objects.”

यावरुन विटगेन्स्टाइन यांना जो मुद्दा स्पष्ट करायचा आहे तो ही की, शब्दांमध्ये जे काही बाबतीत साम्य आढळते जसे, त्यांच्या उच्चारण्यात अथवा दिसण्यात त्यामुळे त्यांच्या नानाविध कार्याकडे आपले दुर्लक्ष होते आणि त्यामुळे भाषेचे खरे स्वरुप आपणांस आकलन होत नाही. भाषेचे खरे स्वरुप शब्द आणि वस्तू यांचा केवळ संबंध समजून समजणार नाही तर हा खेळ म्हणजे वस्तूचे नाव काय अथवा शब्दाचा अर्थ काय असे विचारणे भाषेच्या ज्या चौकटीत खेळला जातो, ज्या नियमांच्या साहयाने खेळला जातो त्या चौकटीचे, नियमांचे स्वरुप समजलयाने समजू शकते. दुसऱ्या शब्दांत, शब्दांना एका ठराविक साच्यातील, स्थिर असा अर्थ नसतो, तर त्यांना त्यांच्या प्रयोगानुसार त्यांच्या कार्यानुसार, भिन्न अर्थ प्राप्त होत असतो, अशी विटगेन्स्टान यांची भूमिका आहे.

## ‘ट्रॅक्टटस’ आणि ‘इनव्हेस्टीगेशन्स’ मधील भूमिकांची तुलना

‘ट्रॅक्टटस’ मधील भूमिकेनुसार भाषेची रचना व जगाची रचना यांच्यात एकरुपता असावी, एक तर्कभाषा असावी, भाषेमागे तार्कितकता असावी. थोडक्यात विज्ञानात जशी कृत्रिम भाषा असते तशी तत्त्वज्ञानात, चिंतनाच्या कोणत्याही क्षेत्रात असावी असा आग्रह विटगेनस्टाईनचा आहे.

मात्र ही भूमिका तो ‘इनव्हेस्टीगेशन्स’ मध्ये पूर्णपणे बदलतो. येथे त्याच्या मते भाषा नैसर्गिकरित्या जशी असते तशीच असू द्यावी , ती बदलू नये, आहे तीच भाषा आपला अर्थ व्यक्त करण्यासाठी पुरेशी समर्थ आहे. तिचे विश्लेषण करण्याच्या फंदात पडू नये. फक्त तिच्यातील बदल तिचा वापर करणाऱ्याच्या गरजेतून झाले पाहिजेत, असे मत तो मांडतो. तत्त्ववेत्त्याने या दैंनदिन भाषेचेचे वर्णन करावे, तिची मर्यादा व सामर्थ्य लक्षात घ्यावे असे तो म्हणतो. असे केल्यास चुकीचे दिशाभूल करणारे, गैरसमज पसरविणारे तत्त्वज्ञान व अध्यात्मशास्त्र निर्माण होणार नाही, शिवाय तत्त्ववेत्त्यांबद्दलही लोकांमध्ये जरा बरे मत होईल, असे तो म्हणतो.

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



**क) जीवनाचे अविष्कार (forms of life)**

शब्दांचा अर्थाविषयी त्यांच्या विटगेन्स्टाइन जे म्हणतो तेच वाक्यांच्या अर्थाविषयीही ते म्हणतो. म्हणजेच वाक्यांनाही जो अर्थ प्राप्त होतो तो भाषेतील त्यांच्या कार्यावरुन, विविध भाषिक व्यवहारातील त्यांच्या संदर्भावरुन, प्राप्त होत असतो. वाक्यांना एक ठराविक, स्थिर असा अर्थ नसतो. कारण वाक्यांचे भिन्न प्रकार असतात, भिन्न संदर्भ असतात आणि या संदर्भामुळे त्यांना भिन्न अर्थ प्राप्त होत असतात, असे विटगेनस्टाइन समजतो. उदाहरणार्थ, पाऊस पडत आहे. या वाक्याचा प्रयोग नाटकात किंवा भाषांतरात किंवा पाठांतरात अथवा वस्तुस्थितीचे कथन करण्यात होऊ शकतो. आणि नाटक, भाषांतर, पाठांतर आणि वस्तुस्थितीचे कथन हे भिन्न उपकम आहेत. भिन्न भाषिक व्यवहार आहेत. यानांच विटगेन्स्टाइन **जीवनाचे अविष्कार (forms of life)** असे म्हणतो.[3]

शब्द आणि वाक्य यांचा अर्थ हा त्यांच्या विशिष्ट संदर्भातील प्रयोगांमुळे त्यांना प्राप्त होत असतो. हे स्पष्ट केल्यानंतर हा अर्थ आपणास समजतो. पण मग त्याचे आपणास आकलन होते, म्हणजे नेमके काय ? याचा विटगेन्स्टाइन विचार करतो. या संदर्भात अर्थाचे आकलन आपणास कसे होते ? हा प्रश्न विटगेन्स्टाइनच्या मते मानसशास्त्रीय प्रश्न असल्याने त्याचा विचार करण्याची गरज नाही. तर ''आकलन होणे म्हणजे काय, त्याचा निकष कोणता आहे '' या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे, कारण तो तार्किक प्रश्न आहे, असे विटगेन्स्टाइनला वाटते. म्हणूनच आकलन होते म्हणजेच काय आकलन होते ? हे आपणांस कळते, समजते. म्हणजे काय तसेच आपणाला स्वत:ला एखाद्या शब्दाचा अर्थ आकलन होतो आणि इतरांना त्या शब्दाचा अर्थ आकलन होतो हे ठरविण्याचे निकष भिन्न असतात की एकच असतात या महत्वाच्या प्रश्नांचा विचार विटगेन्स्टाइन करतो.[4]

---------------------------------------------------------------

[3] (PI. 1.19, 23)पाहा. Strawson: Wittgenstein's Philosphical Investigations. 'Freedom and Resentment,' P. 165)

[4] ( P.I.153-55, 179, 180, 323-28)